सार्वमत कृषिदूत
बुधवारी व शनिवारी

नवी आशा नवी दिशा
# सार्वमत

। अंक ८० । वर्ष ४५ वे । गुरुवार, ९ एप्रिल २०२० । पाने १०+भविष्यवेध

ग्रेनाईटला उत्तम पया
▶ आर्टिफिशिअल स्टोन
▶ विविध रंगात उपलब्ध
▶ मिरर/लपाटो/लेदर फिनीश
▶ स्टेन फ्री
अतुल ट्रेडिंग कॉर्पोरेश
मेनरोड, श्रीरामपूर, फोन: (०२४२२) २२४

# कर्जत-जामखेडसाठी तीनशे किट



**जामखेड (तालुका प्रतिनिधी)**– आमदार रोहित पवार यांच्या संकल्पनेतुन मुकुल माधव संस्था पुणे, सेंटर फॉर युथ डेव्हलपमेंट पुणे व कर्जत जामखेड एकात्मिक विकास संस्थेच्या मदतीने जीवनावश्यक वस्तूंच्या १६ किलो वजनाच्या सुमारे ३०० किटचे वाटप मतदारसंघातील कर्जत व जामखेड तालुक्यात करण्यात येत आहे.या किटमध्ये डाळ,तांदूळ,तेल,आटा,साखर ,चहापावडर,मीठ,मसाला,पोहे ,बिस्किट,साबन अशा वस्तूंचा समावेश आहे.आजच्या संकटकालीन परिस्थितीत निराधार नागरीकांचे,हातावर पोट असणाऱ्या मजुरांचे तसेच अल्पकाळासाठी स्थलांतरीत झालेल्या नागरीकांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. अशा नागरीकांना या मदतीने दिलासा मिळाला आहे.

कोरोना रोगाच्या पार्श्वभुमीवर शासनाने घालुन दिलेल्या निर्बंधांचे सर्वच स्तरातुन पालन केले जात आहे.यासाठी विविध सामाजिक संस्था तसेच सामान्य नागरिकांकडुनही प्रशासनास चांगले सहकार्य लाभत आहे. कोरोनामुळे सर्वच क्षेत्रातील नियोजन बिघडले आहे.याचा फटका सर्वसामान्यांही तेवढाच बसला आहे.मात्र अशावेळी प्रत्येकाने स्वतःची व कुटुंबाची काळजी घेणे गरजेचे आहे. कोरोना रोगाला हद्दपार करण्यासाठी आमदार पवार यांच्यावतीने राबवण्यात येणारे विविध उपक्रम कोरोनावर मात करत आहेत.

या किटचे वितरण करताना मुकुल माधव संस्थेच्या रितु छाबडीया,सेंटर फॉर युथ डेव्हलपमेंटच्या प्रिया कोठारी, कर्जत-जामखेड एकात्मिक विकास संस्थेचे मान्यवर, जामखेडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

समीर शेख पत्रकार दै सार्वमत जामखेड तालुका प्रतिनिधी